EER Reviewed [illegible] JOURNAL

ISSUE-27 VOLUME-5 MPACT FACTOR-SJIF-6.586, IIFS-4.125

ISSN-2454-6283 जनवरी–मार्च, 2022

AN INTERNATIONAL MULTI-DISCIPLINARY RESEARCH JOURNAL

IMPACT FACTOR- IIJIF-7.312 NEW

# शोध-ऋतु

5



सम्पादक
डॉ. सुनील जाधव

तकनीकी सम्पादक
अनिल जाधव

पत्राचार हेतु कार्यालयीन पता -
डॉ.सुनील जाधव,
महाराणा प्रताप हाउसिंग सोसाइटी,
हनुमान गढ़ कमान के सामने,
नांदेड़-४३१६०५, महाराष्ट्र

web:- www.shodhritu.com
Email - shodhrityu78@yahoo.com
WhatsApp 9405384672

-रणवीर सिंह सोढ़ी........43
18.'कितनी कैदें' कहानी में नारी सरोकार........46
-प्रीति गुप्ता........46
19.शकुन्तला महाकाव्य में रस........48
–संजय कुमार........48
20.मैनपुरी जनपद में सतत कृषि पद्धतियों का नियोजन........51
–डॉ0 राजकुमार सिंह........51
21.ग्रामीण विकास में सरकारी योजनाओं की भूमिका एवं प्रभाव का मूल्यांकन........57
– [1]अरूण कुमार यादव, [2]डॉ.धीरेन्द्र कुमार,........57
22.लोक साहित्य........60
–संतोष गुप्ता........60
23.The Schemes of Government of Madhya Pradesh and Department of Higher Education: A report........62
-Dr. Ravikant Singh........62
24.भारतीय उप–महाद्वीप में लोहे की पुरातनता–उद्भव और विकास भाग–2........64
– डा0 सुष्मिता........64
25.महिलाओं की प्रस्थिति और साहित्य की भूमिका........68
–डॉ.सम्पत लाल रेगर........68
26.Quest Of The Philosophical Texts & Contexts Of S. Dr. Radhakrishnan........70
-Dr. Laxmi Kant Tripathi........70
27.The Human Cycle: A Script On Spiritual Superiority Over Mind & Matter........73
-Dr. Laxmi Kant Tripathi........73
28.जिल्हा व सत्र न्यायालय........76
–डॉ.घुमाळे घोंडिराम कामाजी........76
29.समेकित बाल विकास सेवा योजना के क्रियान्वयन में आँगनवाड़ी कार्यकर्ताओं का योगदान........78
–डॉ.रानी जाटोलिया........78
30.डॉ.व्यासमणि त्रिपाठी का काव्य संग्रह 'सड़क पर रोटी' में वर्तमान यथार्थ........82
–डॉ.रत्ना कुशवाह........82
31.कोरोना वायरस : मानवता के खिलाफ एक अभूतपूर्व जंग (एक विशद विवेचन)........85
[1]डॉ. संगीता तिवारी, [2]डॉ0 भानु प्रताप सिंह........85
32.भारतीय राजकारणात महिलांचे स्थान........89
–प्रा.दिनकर सुदामराव रासवे........89

ISSUE-27 VOL- 5 IMPACT- IIJIF-7.312 ISSN-2454-6283 जनवरी–मार्च–2022

## 32.भारतीय राजकारणात महिलांचे स्थान

–प्रा.दिनकर सुदामराव रासवे
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
व्यंकटेश महाजन वरीष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना** :–15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतातील स्थानिक शासनाच्या नव्या युगाला प्रारंभ झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले ते मर्यादित होते. मात्र ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु झाले. मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वांच्या माध्यमातून ग्रामीण भागाला स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. विशेषत: कलम 40 नुसार पंचायतीच्या स्थापनेची तरतुद करण्यात आली.

राज्यघटनेच्या माध्यमातून केंद्र व राज्य यांच्यामध्ये जी अधिकारांची वाटणी करण्यात आली त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्यसुचीमध्ये देण्यात आला. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध घटकराज्यांनी स्वतंत्र कायदे केले. महिलांची स्थिती व दर्जा सुधारण्यासाठी राज्यघटनेच्या चौथ्या भागातील राज्यांच्या मार्गदर्शक तत्वामध्ये महिलांसाठी स्वातंत्र्य तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम 38 मध्ये महिलांची स्थिती सुधारुन त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी तरतुद करण्यात आली. कलम 39 मध्ये महिला व बालकांसाठी पुरेशा प्रमाणात उपजिवीकेची साधने उपलब्ध करुन देणे त्यांना संरक्षण, आरोग्य, काम करण्याच्या ठिकाणी योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी राज्याची असते असे म्हटले गेले. भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग हा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात झालेला आहे कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, कमला नेहरु, सुचेता कृपालिनी, विजयालक्ष्मी पंडीत, राजकुमारी आमृता कौर, उषा मेहता, अरुणा असफ अली या सारख्या महिला स्वातंत्र्य आंदोलनात अग्रभागी होत्या. भारतीय महिलांना राजकारणात व समाजकारणात पुढाकार घेण्यासाठी स्वातंत्र्य लढयातील महिला प्रेरणादायी ठरल्या. रजीया सुलताना, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी, महाराणी लक्ष्मीबाई ह्या महिला आपल्या प्रयत्नातून स्वातंत्र्यपूर्व काळात सत्तेवर आल्या होत्या. भारतीय राजकारणात भारतातील महिलांनी आपल्या हिमतीने व स्वकर्तृत्वाने शासन व प्रशासनातील उच्च पदे प्राप्त करुन दाखविले आहेत. यामध्ये प्रामुख्याने विजयालक्ष्मी पंडीत (युनोत प्रतिनिधीत्व), सुचेता कृपालिनी (उत्तर प्रदेश मुख्यमंत्री), नंदिनी सत्पथी (ओरीसाच्या मुख्यमंत्री), इंदिरा गांधी (भारताच्या पंतप्रधान), जय ललिता (तामिळनाडूच्या मुख्यमंत्री), राबडीदेवी (बिहारच्या मुख्यमंत्री), मायावती (उत्तरप्रदेशाच्या मुख्यमंत्री) याशिवाय सोनिया गांधी, मनेका गांधी, सुषमा स्वराज, वसुंधरा राजे, विजया राजे शिंदे अशा अनेक महिलांचा समावेश आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचे मुलभूत घटक मानल्या जातात. म्हणून लोकशाही दृढ –रावयाची असेल तर लोकसंख्येने 50 असलेल्या महिलांना पंचायतीराज संस्थामध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. पंचायतीराज मधील महिलांच्या राजकीय सहभागाविना लोकशाहीचा विचार करणे म्हणजे लोकशाहीची घोर विटंबना करण्यासारखे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधील राखीव जागांमुळे देशातील सहा लाख पंचाहत्तर हजार महिला ग्रामपंचायतीच्या सदस्या आहेत आणि पंचाहत्तर हजाराहून अधिक सरपंच आहेत. संपूर्ण देशातील 37523 महिला पंचायत समितीच्या सदस्या आहेत. तर 1500 महिला सभापती आहेत आणि 3166 महिला जिल्हा परिषद सदस्या आहेत तर 122 महिला जिल्हापरिषदेच्या अध्यक्षा आहेत. याचप्रमाणे आरक्षणाच्या फायदा घेवून महाराष्ट्रातही स्थानिक स्वराज्य संस्था तिन्ही स्तरावर (महाराष्ट्रातील निवडणूक आरोगाच्या 2004 च्या आकडेवारी नुसार) 93333 महिला ग्रामपंचायतीच्या सदस्या आहेत. तर 9125 महिला सरपंच आहेत. पंचायत समित्यांमध्ये 1200 महिला सदस्या व 106 महिला सभापती आहेत तर जिल्हा परिषदेमध्ये 576 महिला सदस्या आहेत. तर 10 महिला जिल्हा परिषद अध्यक्षा आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थामधील 33 आरक्षणामुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात राजकीय सहभाग वाढला असल्याचे चित्र आकडेवारी वरुन स्पष्ट होते. 73 व्या घटनादुरुस्तीन महिलांसाठी 33 (जागा आरक्षीत केल्यामुळे महिला राजकारणात उतरल्या हे सत्य आहे. याचा अर्थ असा की आरक्षणामुळे महिलांना राजकारणात प्रवेश करण्याची संधी मिळाली आहे. पण त्या संधीचे सोन करण्यासाठी महिलांच्या मनावर नेमक्या कोणत्या व्यक्तीचा, घटनेचा, कोणत्या परिस्थितीचा प्रभाव पडला आहे ती परिस्थिती महत्वाची मानावी लागेल.

**सारांश** :लोकशाही समाज हा सहभागीतापूर्ण समाज असून ज्यामध्ये सत्ता लोकशाही प्रतिनिधीच्या अंतर्गत असते. यामध्ये समाजातील स्त्री, मागासवर्गीय सामान्य नागरिक यांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग अपेक्षीत असतो. त्यामध्ये लिंग, जात, वर्ग, धर्म इत्यादी बाबीं गोण असतात. लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी लोकसंख्येच्या 50 असलेल्या महिला/स्त्रीवर्गाला सत्तेत सहभागी करुन घेणे महत्वाचे ठरते. राजकीय सहभाग म्हणजे नागरीकांचा राजकीय क्रियामधील सहभाग असून तो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या

निर्णय निर्धारणकर्त्यांच्या वर्तणूकीवर प्रभावकरी ठरतो. लोक सहभागाशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही. त्यामुळे भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्रीयांच्या राजकीय सहभागासाठी विशेष प्रावधान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे स्त्रियांना अधिकाधिक समाजाभिमुख बनविण्यासाठी त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुण व क्षमतांचा विकास होणे गरजेचे आहे. त्यामधून खया अर्थाने सशक्त भारत निर्माण होईल..

**संदर्भग्रंथ सूची :–**

(1)बडे जी.एस., भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था उगम आणि विकास. हिमालय पब्लिकेशन हाऊस, मुंबई 1978 (2)बिराजदार / घोडके, भारतातील स्थानिक स्वशासन संस्था, अंशुल पब्लिकेशन नागपूर(3)भोळे भा. ल. भारतीय राज्यव्यवस्था, पिपळापूर अन्ड के. पब्लिशर्स नागपूर– 2003. (4)पंचायत भारती, पंचायती राज प्रबोधन संस्था, ठाणे 2004–050

ISSN-2454-6283 PEER Reviewed JOURNAL